www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार

दैं. युवक आधार करीता
प्रतिनधिी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग
खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर,
अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर
प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक – सौ भारती संतोष आमले उपसंपादक – श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक – श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक – श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 176 वा बुधवार दि. 12 मार्च २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## शब्दपूर्ती करणारा समतोल अर्थसंकल्प : खा. अशोक चव्हाण

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**



**नांदेड-** यंदाच्या महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात आर्थिक आव्हानांना योग्य प्रकारे हाताळून सरकारने दिलेल्या प्रत्येक शब्दाची पुर्ती करणारा एक उत्तम, समतोल अर्थसंकल्प सादर केल्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण यांनी म्हटले आहे. पानिपत येथे युद्ध स्मारक, आग्रा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचे व संगमेश्वर येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मारकाच्या घोषणा लोकांची मने जिंकणारी नाहे. शेतकरी, महिला, युवक आदी समाजघटक आणि उद्योग, गुंतवणूक, शिक्षण, नारोग्य, सहकार आदी क्षेत्रावर भर दिला आहे. विशेषतः अवघ्या पाच किलोमीटरच्या रिघात आरोग्य सेवा देण्याची घोषणा भविष्याचा वेध घेणारी असल्याचे ते म्हणाले.

## वॉटर ग्रीडच्या तरतुदीचा अर्थसंकल्पात पुन्हा उल्लेख

### ३७ हजार ५०० कोटींच्या निधीचा उल्लेख

छत्रपती संभाजीनगर : २०१४ मध्ये युतीचे सरकार असताना घोषणा करण्यात आलेल्या वॉटर ग्रीडच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पास पुन्हा ३७ हजार ५०० कोटी रुपये लागतील, असे राज्याच्या अर्थसंकल्पात नमूद करण्यात आले आहे. सिंचनाच्या नदीजोड प्रकल्पांशिवाय मराठवाड्यातील मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप केला जात आहे. १७ स्पटेंबर रोजी मराठवाड्याच्या विकासासाठी घेण्यात काही निर्णयांना तरतूद मिळण्याची आवश्यकता होती. त्याकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप केला जात आहे. मराठवाडा वॉटर ग्रीडचा अभ्यास इस्त्राईलचा मेराकोटा नावाच्या संस्थेने केला होता. मात्र, महाविकास आघाडी आणि



महायुतीच्या वादात अडकलेल्या 'वॉटर ग्रीड' योजना पुन्हा एकदा अर्थसंकल्पाच्या भाषणात आली. वॉटर ग्रीड योजना मंजूर होण्यापूर्वीच गंगापूर, सिल्लोड, वैजापूर येथे स्वतंत्रपणे पाणी पुरवठा योजनांना निधी मंजूर करण्यात आला होता. दरम्यान, पुन्हा एकदा वॉटर ग्रीड योजनेस पुनरुज्जीवन मिळाले आहे. ही योजना बबनराव लोणीकर पाणी पुरवठा मंत्री असताना मंजूर करण्यात आली होती. २०१९ च्या विधानसभा निवडणुकांपूर्वी या योजनेस निधीची तरतूदही करण्यात आली होती. महाविकास आघाडी सरकारच्या काळात या योजनेला स्थगिती देण्यात आली. एकाच कायमस्वरुपी जलस्त्रोतातून संपूर्ण मराठवाड्याला पाणी पुरवठा करण्याची या योजनेचे स्वरुप आता बदलेले आहे किंवा कसे याचे उल्लेख नाहीत. मात्र, आता पुन्हा एकदा वॉटर ग्रीड योजनेस तरतूद असेल असे अर्थसंकल्पात नमूद करण्यात आले आहे. नागपूर आणि विदर्भात अनेक प्रकल्प नेण्यात आले आहेत. मात्र, मराठवाड्यातील अनेक मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी केला आहे.

## संगम येथील मंदिराच्या जिर्णोध्दारासाठी शासनाचे निधीची वाट बघणार नाही.देवाच्या नावाने कोणीही भांडवल करु नये-*आमदार किसन कथोरे

**दैनिक युवक आधार**
**मुरबाड वार्ताहर**

मुरबाड तालुक्याचे सर्वांगीण विकासासह तिर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी मी कटिबद्ध असुन तमाम भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या संगम तिर्थक्षेत्राचा कायापालट करण्यासाठी मागील वर्षी हजारो भक्तगण साधुसंत व मान्यवरांचे उपस्थितीत भुमिपुजन केले आहे.परंतु शासनाकडून निधी मिळण्यासाठी काही तांत्रिक अडचणी समोर आल्याने टेंडर निघण्यास काही




अवधी जाणार असल्याने.तमाम मुरबाड तालुक्यातील जनतेचे श्रध्दास्थान असलेल्या संगम तिर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी आमदार किसन कथोरे यांनी जनतेला दिलेला शब्द पाळण्यासाठी काही दिवसांपूर्वी मंदिर तोडण्याचे काम हाती घेतले आहे.परंतु या तिर्थक्षेत्राचे जिर्णोध्दाराकडे तमाम भाविकांचे लक्ष लागले असताना काही विध्न संतोषी याचे भांडवली राजकारण करत असले तरी मंदिराचे काम काही दिवसांतच सुरु होईल. कारण यामध्ये राजकीय मंडळी व तमाम भक्तगणासह नागरिक या भांडवली आणि मांडवली आंदोलनाला पाठिशी घालणार नाहित असा तमाम मुरबाड करांना आत्मविश्वास आहे.

## सकल हिंदू समाजातर्फे लासलगाव येथे श्री हनुमान चालीसा पठण कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी :-राजेश भडांगे**
**लासलगाव...**

येथे होळी ते हनुमान जन्मोत्सव या काळात पंधरा दिवस श्री हनुमान चालीसा पठण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून गेल्या दोन वर्षापासून या सोहळ्याला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

शहरातील विविध मंदिरामध्ये सात हनुमान चालीसा पठण कार्यक्रम हा धार्मिक सोहळा संपन्न होणार असून
शनिवार दिनांक १५ श्री इच्छापूर्ती गणेश मंदिर,
मंगळवार दिनांक १८ सर्वे नंबर ९३ आंबे माता मंदिर,
शनिवार दिनांक २२ लक्ष्मीनारायण मंदिर,
मंगळवार दिनांक २५ गणेश नगर येथील दुर्गा माता मंदिर,
शनिवार दिनांक २९ श्री हनुमान मंदिर ब्राह्मणगाव विंचूर,
रविवार दिनांक ३० बालाजी मंदिर,
मंगळवार दिनांक ०१
श्रीराम नगर येथील क्रांती चौक,
शनिवार दिनांक ०५ पिंपळगाव नजीक येथील हनुमान मंदिर,
रविवार दिनांक ०६ बाबा अमरनाथ मंदिर वेळ ०४ वाजता,
सोमवार दिनांक ०७ श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर विद्यानगर,
मंगळवार दिनांक ०८ श्रीराम मंदिर टाकळी विंचूर,
बुधवार दिनांक ०९ साईबाबा मंदिर लासलगाव,
गुरुवार दिनांक १० गणेश मंदिर गणेश नगर,
शुक्रवार दिनांक ११ श्री हनुमान मंदिर रेल्वे स्टेशन लासलगाव.
आणि श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त अखेरचा पाठ शनिवार दिनांक २ श्रीराम मंदिर लासलगाव येथे संपन्न होणार आहे. सर्व भाविकांनी दररोज रात्री ०९ वाजता या श्री हनुमान चालीसा पठण कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सकल हिंदू समाजातर्फे करण्यात आले आहे.



## गिलानी महाविद्यालय,रासेयो विशेष श्रम संस्कार शिबीर संपन्न

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेंन्दोर**



घाटंजी: संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित शि.प्र. मं. विज्ञान व गिलानी कला ,वाणिज्य महाविद्यालय घाटंजी अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे दिनांक १ मार्च २०२५ ते ८ मार्च २०२५ या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे विशेष श्रम संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते ,रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. सी .आर .कासार महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.के. आर.किर्दक, सहकार्यक्रम अधिकारी प्रा.सुहास मोरे यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाने दत्तक ग्राम खापरी येथे विशेष श्रम संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले, शिबिरात ग्राम विकासाच्या दृष्टिकोनातून ग्राम स्वच्छता, शाळा परिसराची स्वच्छता, ग्रामपंचायत कार्यालय स्वच्छता करण्यात आली, पर्यावरण जनजागृती, वृक्षारोपण,महिला सक्षमीकरण, "बेटी बचाव बेटी पढाव रॅली", बंधारा बांधणे , संविधान जनजागृती, शेतकरी कुटुंबाचा सर्वे, अंधश्रद्धा निर्मूलन, सांस्कृतिक कार्यक्रम, पथनाट्यद्वारे जनजागृती, MY BHARAT पोर्टलवर रजिस्ट्रेशन करणे, ८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांचा सत्कार करण्यात आला, इत्यादी कार्यक्रम विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये आयोजित केल्या गेले, कार्यक्रमाच्या समारोपीय कार्यक्रमाकरिता अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम. ए. शहजाद सर, शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालिका सौ आलिया शहजाद मॅडम, दत्तक ग्राम खापरीच्या सरपंच सौ. कल्पनाताई काकडे प्रमुख पाहुणे म्हणून लाभल्या सुरुवातीला संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, क्रांतिजोति सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून व द्वीप प्रज्वलन करून सुरुवात करण्यात आली, कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.सी.आर. कासार यांनी केले प्रास्ताविक यामध्ये दिनांक १ मार्चपासून ते ८ मार्च म्हणजेच समारोपिय कार्यक्रमापर्यंत सर्व आढावा सांगितला यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य व सन्माननीय प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते शिबिरामधील कार्य करणारे उत्कृष्ट शिबिरार्थी यांना पारितोषिक वितरण करण्यात आले, महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी शिबिराचे आयोजनाबाबद कार्यक्रम अधिकारी व उपस्थित प्राध्यापक, प्राध्यापिका व शिबिरार्थी यांचे कौतुक केले .कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. सी. आर. कासार यांनी दत्तक ग्राम खापरी सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, ज्येष्ठ नागरिक, ग्रामस्थ, तसेच महाविद्यालयातील शिक्षक कर्मचारी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे आभार मानले , राष्ट्रगीता नंतर राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिराची सांगता झाली.

## काळुंद्रे गाव आणि तक्का गाव यांच्या मधून वाहणाऱ्या गाढी नदीच्या पात्राजवळच व्यावसायिकांकडून करण्यात येत आहे प्रचंड प्रमाणात भराव

### कारवाईची शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची मागणी


आयुक्त मंगेश चितळे यांना निवेदन सादर करताना शिवसेना पदाधिकारी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

पनवेल तालुक्यातील काळुंद्रे गाव आणि तक्का गाव यांच्या मधून वाहणाऱ्या गाढी नदीच्या पात्राजवळच व्यावसायिकांकडून प्रचंड प्रमाणात भराव करण्यात आला आहे. या भरावाच्या कामा दरम्यान नदीच्या पात्रातही भर टाकण्यात आली आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात परिसरातील गावामध्ये पाणी शिरण्याची दाट शक्यता आहे तरी अशा प्रकारे बेकायदा भराव करणाऱ्या व्यावसायिकांवर कारवाई करण्याची मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे करण्यात आली आहे.

आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उप शहर संघटक नंदू घरत यांच्यासह शहरप्रमुख प्रवीण जाधव व युवासेना जिल्हाधिकारी पराग मोहिते यांनी महानगर पालिका आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेतली. पावसाळ्यात नेहमीच गाढी नदीचे पात्र ओसंडून वाहत असते ज्यामुळे काळुंद्रे गावात पाणी भरते. आता या भरावामुळे हे पाणी गावाच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात भरून गावातील रहिवासी परिसरात मोठे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तरी संबंधित व्यावसायिकांवर कारवाई करण्यात यावी यासाठी नंदू घरत यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन देऊन तात्काळ दखल घ्यायची विनंती केली आहे. या मागणीची महापालिका आयुक्तांनी तात्काळ संबंधित विभागाला पाहणी करून कारवाई करण्याचे आदेश या भेटी दरम्यान दिले आहेत. त्याचप्रमाणे तहसीलदार विजय पाटील यांनीही पाटबंधारे खात्याला याची तपासणी करण्याच्या सूचना करण्यास सांगितले आहे.

## चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूल, गिरगाव ची इंडिया बुक रेकॉर्डमध्ये नोंद.



**दैनिक युवक आधार**
**मुबंई प्रतिनिधी**



मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर येणाऱ्या या पहिल्याच मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून चिकित्सक समूहाचे सचिव डॉ. गुरुनाथ पंडित यांनी हा दिवस सूर्योदय ते सूर्यास्त या वेळेत एका मागोमाग एक सर्व कालखंडातील गाणे जसे अभंग, भारुड, गण, गवळण, लावणी, पोवाडा, नाट्यगीते ,चित्रपट गीते, बालगीते इत्यादी सादर करण्याची संकल्पना मांडली. चिकित्सक समूहाचे अध्यक्ष श्री किशोर रांगणेकर सरांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली संपूर्ण कार्यक्रम अत्यंत यशस्वीपणे संपन्न झाला. याची दखल इंडिया बुक ऑफ रेकॉर्डने घेऊन शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती संचिता गावडे यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविले. मराठी भाषा गौरव दिनाचा एक भाग म्हणून शाळेमध्ये पुस्तकांचे गाव तयार करण्यात आले आहे, तसेच मुलींचे बँड पथक लेझीम खेळणाऱ्या विद्यार्थ्यांचा चमू व महाराष्ट्रातील 36 जिल्ह्यांची नावे व त्यांच्या बोलीभाषांचे नाव असलेले फलक व पेहराव असलेल्या विद्यार्थिनींनी गिरगावच्या प्रमुख रस्त्यांवरून संचलन केले. संपूर्ण गिरगाव परिसरात हा आकर्षणाचा विषय ठरला होता.



# नवीकरणीय ऊर्जा सक्षमतेमुळे मिळणार महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना पाठबळ

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

२०३० सालापर्यंत ५० टक्के नवीकरणीय ऊर्जा प्राप्त करत शेतकऱ्यांना शाश्वत आर्थिक पाठबळ देण्याचे ध्येय महाराष्ट्र राज्याने डोळ्यापुढे ठेवले आहे. या उद्दिष्ट पूर्तिकरिता खावडा -४ पार्ट सी यांच्या पुढाकाराने गुजरात राज्यातून हरित ऊर्जा महाराष्ट्राला उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पर्यावरण पूरक अशी ऊर्जा ही तुलनात्मक दृष्ट्या स्वस्त देखील आहे. महाराष्ट्राला प्रगतिशील राष्ट्र बनविण्याकरता नवीकरणीय ऊर्जा प्राप्त करणे हे जितके महत्त्वाचे आहेत तितकेच ती ऊर्जा आणण्यासाठी वीज वाहक यंत्रणा उभारणे हे देखील तितकेच महत्त्वाचे ठरते. म्हणूनच खावडा कॉरिडोर चे माध्यमातून अखंडित नवीकरणीय वीज पुरवठा करणारी यंत्रणा नव्याने उभारण्यात येत आहे. सदर वीज वाहक यंत्रणेद्वारे महाराष्ट्रातील ग्रामीण तसेच शहरी भागांना अखंडित वीज पुरवठा करणे सोपे जाईल. गुजरात राज्यातून येणारी नवीकरणीय ऊर्जा ही महाराष्ट्राच्या आर्थिक पातळीवर देखील अनन्यसधारण महत्त्व बाळगून आहे. हरित ऊर्जा ही सौर ऊर्जा तसेच पवनचक्की यांच्या माध्यमातून निर्मिली जणार असल्यामुळे




पारंपारिक ऊर्जा वापर कमी करण्यास तो अत्यंत महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. यामुळे औषमिक ऊर्जा निर्मिती वरील खर्च कमी होणार असल्यामुळे आर्थिक पातळीवर राज्यावरील भार कमी होईल. म्हणूनच खावडा कॉरिडोर ही केवळ ऊर्जा प्राप्ती करणारी लाईन नसून ती महाराष्ट्राची लाईफ लाईन बनेल यात जराही दुमत नाही. खावडा कॉरिडोर उभारण्याकरता ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीचा वापर केला जाणार आहे त्यांना सुलभ आणि समाधानकारक मोबदला दिला जात आहे.याकरता भूसंपादन न करता त्या जमिनी शेतकऱ्यांच्याच नावावरती राहतात. म्हणजेच जमिनीच्या उताऱ्यावरील सातबारा नोंद ही त्यांच्याच नावे राहते. विशेष लक्षणीय म्हणजे कॉरिडोर निर्मितीनंतर देखील शेतकरी तारांच्या खाली शेती, मळा,कुक्कुटपालन, शेतीपालन असे व्यवसाय करू शकतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या दृष्टीने दुहेरी लाभ मिळवून देणारा हा प्रकल्प असेल. येणारी नवीकरणीय ऊर्जा ही उपभोक्त्यांच्या खिशावरील भार हलका करणारी असल्यामुळे त्यांना देखील दिलासा मिळेल. खावडा कोरीडॉर यांच्या माध्यमातून मुबलक ऊर्जा निर्मितीमुळे औद्योगिक व्यवसायांना चालना मिळणार असून त्यायोगे सक्षम रोजगार निर्मिती देखील होईल.

हरित ऊर्जेच्या वापरामुळे पारंपरिक ऊर्जेचा वापर हा कमी होईल. अर्थातच त्यामुळे कार्बन उत्सर्ग प्रमाणावर अंकुश बसेल. पर्यावरणाच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा ठरतो. महाराष्ट्र राज्याने नवीकरणीय ऊर्जा निर्मिती करता ७५००० करोड रुपये निधीची तजवीज केलेली असून २०२६ पर्यंत हावडा कॉरिडोर पूर्ण होणार आहे. पर्यावरण पूरक आणि उपभोक्त्यांना दिलासा देणारी ऊर्जा मिळाल्यावर राज्याच्या आर्थिक स्थिरतेला मोठा हातभार लागेल. नवीकरणीय ऊर्जा ही सौरऊर्जा,पवन ऊर्जा आणि हायड्रो प्रोजेक्ट यांच्या माध्यमातून मिळवली जाईल. सदर कॉरिडोर निर्माण करण्याकरता आद्ययावत यंत्रणा वापरली जात आहे. तसेच दुर्गम डोंगरी विभागामध्ये पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आणि वेळेत प्रकल्प पूर्ण करण्यासाठी हेलिकॉप्टरचा अवलंब देखील करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्यातील धोरणी नेतृत्वांनी राज्यातील दुर्गम आणि ग्रामीण विभागातील शेतकरी, बागायतदार आणि अन्य व्यावसायिक यांना सुलभ व्यवसाय करण्यासाठी हा प्रकल्प अंगीकारला आहे. लघु व्यावसायिक आणि स्वयंरोजगार असणाऱ्या नागरिकांना देखील कमी खर्चिक आणि पर्यावरण पूरक वीज मिळवून देण्यासाठी खावडा कॉरिडोर फायदेशीर पडणार असल्याचे या क्षेत्रातील तज्ञांचे म्हणणे आहे. राजस्थान आणि तामिळनाडू राज्यांमध्ये नवीकरणीय ऊर्जा दुर्गम भगात पोहोचल्याने दुर्गम ग्रामीण विभागातील विकासाचा दर उंचावल्याची ताजी उदाहरणे आपल्यासमोर आहेत. महाराष्ट्रामध्ये कार्यरत असणाऱ्या अनेक सेवाभावी संस्थांनी अशा प्रकारची ऊर्जा महाराष्ट्राच्या ग्रामीण आणि दुर्गम विभागात प्राप्त झाली पाहिजे अशी निरीक्षणे देखील नोंदविली होती. राज्यातील दुर्गम ग्रामीण विभागात प्रभावी शेती करण्यासाठी शिवारामध्ये पाणी पोहोचवणे अत्यंत गरजेचे असते. त्याकरता ऊर्जेचा सातत्याने वापर होत असतो, पारंपारिक ऊर्जा स्त्रोत मर्यादित असल्या कारणामुळे याचा थेट प्रभाव शेतीवर जाणू लागला आहे. म्हणूनच अशा ठिकाणी नवीकरणीय आणि पर्यायाने स्वस्त वीज उपलब्ध करून दिल्याने शेती व्यवसाय अधिक जोमाने करण्यास शेतकऱ्यांना पाठबळ मिळेल. या व्यतिरिक्त ग्रामीण विभागातील लघु तसेच मध्यम स्वरूपाचे व्यावसायिक यांना देखील आर्थिक स्थैर्य प्राप्त होईल म्हणूनच खावडा-४ पार्ट सी हे केवळ ऊर्जा कॉरिडोर उभारत नसून महाराष्ट्राच्या ऊर्जेची जीवन वाहिनी निर्माण करत आहेत. राज्याच्या आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने हा प्रकल्प सुलभ आणि वेळेत पूर्ण होणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे.

## मुरूड जंजिरा किल्ल्यावर जा आता सुखरूप, खोरा बंदरातील नवीन जेट्टीवरून सेवा

दैनिक युवक आधार
निलेश फुंडे रेवदंडा

पर्यटक जीव धोक्यात घालून समुद्रातील जंजिरा व पद्मदुर्ग किल्ला पाहण्यासाठी जाणाऱ्या पर्यटकांना आता सुरक्षित प्रवास करता येणार आहे मुरुड जंजिरा येथील खोरा बंदरातील नवीन जेट्टीचे काम पूर्ण झाले असून दोन दिवसांपासून प्रायोगिक तत्त्वावर येथून बोटसेवा सुरू केली आहे.केंद्र सरकारच्या सागरमाला योजनेअंतर्गत सुमारे ११० कोटी रुपये खर्च करून समुद्राच्या आत तीन मीटर लांब व पाच मीटर रुंदीचा घेर असणारी ही मोठी जेट्टी दोन वर्षांत पूर्ण करण्यात आली आहे सध्या जेट्टीचे संरक्षक लोखंडी पाइप यांना कलर करणे त्याचप्रमाणे इतर रंगरंगोटीचे काम शिल्लक आहेत. खोरा बंदरातील जुनी जेट्टी ही धोकादायक झाली होती.ओहटी वेळी बोटी किनाऱ्यावर लागणे खूप जिकीरीचे व त्रासाचे होत होते. भरतीची वाट पाहत बोटी समुद्रात तासन् तास खोळंबत होत्या. यासाठी या नवीन जेट्टीचा प्रस्ताव करण्यात आला होता. नवीन जेट्टीमुळे पर्यटकांना जंजिरा किल्ला पाहणे अगदी सुलभ आणि सोईस्कर होणार आहे.ही बोटचालकांनी तक्रार केली आहे. जेट्टीवर बोट लागताना त्रास होत आहे, तर बोट थांबत नाही. त्याकरिता आणखी ब्रेकर वॉटरची मागणी बोटचालकांनी केली आहे. बोटचालकांना तुम्ही नियमित प्रवास करा, त्याच अडचणी आल्या, तर त्यावर गांभीर्याने विचार करण्यात येणार असल्याचे मेरी टाइम बोर्डाचे उपअभियंता दीपक पवार यांनी सांगितले. कोटखोरा बंदरात नवीन जेट्टी प्रायोगिक तत्त्वावर दोन दिवसांपासून सुरू केली आहे. बोटचालक व पर्यटकांना या सेवेतून काही त्रुटी आढळल्यास त्या दूर करून ही सेवा आता कायमस्वरूपी सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती दीपक पवार यांनी दिली.



## कोल्हापूर रत्न पुरस्काराराने करण्यात आले सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल : वार्ताहर**

९ मार्च २०२५ रोजी कोल्हापूर जिल्हा पनवेल रहिवासी संघ आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त कोल्हापूर रत्न पुरस्कार - २०२५, वृदांवनबाबा आश्रम नविन पनवेल येथे आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात संघटनेच्या शब्दाला मान देऊन आ.विनय कोरे, अध्यक्ष जन सुराज्य पक्ष, आ.प्रशांत ठाकुर, बाळासाहेब पाटिल माजी. म्हाड़ा सभापती, माया जाधव-काळे, मोहिनी विक्रांत पाटिल हे प्रमुख पाहुण्याच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज,राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले आणि त्यांचे सत्कार केले. अनिल पाटील अध्यक्ष को.जि.पनवेल र.संघ, विनायक डवंग सेक्रेटरी, प्रताप बेटकर खजिनदार आणि 35 संघटक ही हजर होते. यावेळी विविध सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक, क्रिडा, सांस्कृतीक, कला, राजकीय, व्यवसायिक इ क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवर व्यक्तीना प्रमुख पाहुण्याच्या हस्ते "कोल्हापुर रत्न पुरस्कार" शाल, प्रशस्तीपत्र, पुष्पगुच्छ देवून करण्यात आला. यामध्ये एस.टी.नाईक जनरल मनेजर इंडाल रिटा, नेत्रा पाटिल नगरसेविका पनवेल पालिका, आबासाहेब पाटिल, गाडे, माईंगडे, लगरे डी वाय एस पी., सचिन पोवार एपीआय, डॉ.कृष्णा देसाई इत्यादि 30 व्यक्तीना पुरस्कार दिले. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते.अध्यक्ष प्रास्ताविक भाषण केल्यानंतर पाहुण्याची संघटनेला मार्गदर्शक अशी भाषणे केली. कार्यक्रमाची सांगता झाली. सेल्फी पॉईंटचा सर्वांनी आनंद घेतला. या कार्यक्रमाचा कोल्हापुरकर मंडळीनी आस्वाद घेतला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अमोल असुळकर यांनी केले.



## एसटीचे डिजिटल पेमेंट सुसाट ! सिल्लोड आगारास ५०० हून अधिक प्रवासी घेताय लाभ

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:- योगेश पालोदकर**



सिल्लोड :- सिल्लोड आगाराच्या वतीने डिजिटल पेमेंट प्रक्रिया यशस्वीरीत्या राबवली जात असल्याने या डिजिटल पेमेंट योजनेचा दररोज ५०० पेक्षा जास्त प्रवासी लाभ घेत आहेत, अशी माहिती आगार प्रमुख विजय काळवणे यांनी दिली. राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने प्रवाशांच्या सोयीसाठी मागील वर्षभरापूर्वीच वाहकांकडे डिजिटल पेमेंट सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. वाहकांकडे असलेल्या तिकीट मशीनमध्ये डिजिटल पेमेंट राबवताना अनेक अडचणी येत होत्या. त्याबाबत मोठ्या प्रमाणात वाहकांच्या तक्रारी एसटी महामंडळाच्या वरिष्ठ कार्यालयाला तक्रारी प्राप्त झाल्या. महिनाभरापूर्वी एसटी महामंडळाच्या वरिष्ठ कार्यालयाकडून नवीन अत्याधुनिक तिकीट मशीन वाहकांना देण्यात आले असून आता या योजनेला प्रवाशांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. दोन महिन्यांपूर्वी राज्य सरकारने घेतलेल्या भाडेवाडीच्या निर्णयाने मोठ्या प्रमाणात चिल्लर पैशांचा प्रवासी व वाहकांना तुटवडा जाणवू लागला होता. यामुळे अनेकदा वाहक व प्रवाशांमध्ये खटके उडू लागले. त्यामुळे या योजनेबाबत परिवहन महामंडळाकडून मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली. मागील महिन्यापासून या योजनेचा प्रवाशांनी अधिक लाभ घेण्यास सुरुवात केली. सिल्लोड आगारात एकूण ६७ बसेस आहेत. या आगाराच्या वतीने पुणे, नाशिक, अकोला, मालेगाव, जळगाव आदी ठिकाणी लांब पल्याच्या गाड्या सोडण्यात येतात. याशिवाय तालुक्यातील ग्रामीण भागातही सिल्लोड आगारातून मोठ्या प्रमाणात बसेस सुरू आहेत. या बसेसमधून दररोज ४५० ते ५०० प्रवासी डिजिटल पेमेंट या सुविधेचा लाभ घेत आहेत. यामुळे डिजिटल पेमेंटमार्फत आगारास दररोज ५० ते ६० हजाराचे उत्पन्न मिळत आहे.

## कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोवडण्यासाठी आम्ही कटीबद्ध - परेश ठाकूर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**



कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोवडण्यासाठी आम्ही कटीबद्ध असून भारतीय जनता पार्टी ही पुर्ण वेळ या साठी कार्यरत असणार आहे अशी ग्वाही पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी पनवेल महापालिकेतील कंत्राटी कामगारांच्या मेळाव्या वेळी दिली.

म्युनीसीपल एम्प्लॉइज युनीयनच्यावतीने पनवेल महापालिकेतील कंत्राटी कामगारांचा भव्य मेळावा सोमवारी आयोजीत करण्यात आला होता. या मेळाव्याचे उद्घाटन माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. शहरातील ज्येष्ठनागरीक संघांच्या सभागृहात ॲडव्होकेट सुरेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. मेळाव्यता कागरांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली असून कर्मचाऱ्यांना उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन केले. सदर मेळाव्यात नितीन पाटील यांची युनियनच्या सल्लागार म्हणून तर युनियनचे कार्यालय प्रमुख म्हणून महेंद्र गायकवाड यांची निवड करून सत्कार करण्यात आला. तसेच नवी दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत पनवेल महापालिकेच्या अग्नीशमन विभागाने विजेते पद मिळविले त्याबद्दल शुभांगी घुले, तेजस्वी साळुखे आणि अग्निशमन विभागातील पहिल्या महिला वाहनचालक कम ऑपरेटर गीतांजली पाटील यांचाही भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस तथा माजी नगरसेवक नितीन पाटील, माजी नगरसेवक अजय बहिरा, माजी नगरसेविका हेमलता गोवारी, कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरेश ठाकूर, युवामोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, आयोजक अनिल ठाकूर, संतोष पवार, अंकुश गायकवाड दत्तगुरु म्हात्रे, शैलेश गायकवाड यांच्यासह कर्मचारी आणि मान्यवर उपस्थित होते.

## स्नेहसंमेलनामधून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव: पोलीस निरिक्षक विठ्ठल दराडे

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर**
**शिरूरआनंतपाळ : लातूर**

शालेय अभ्यासक्रमा सोबतच कला आणि क्रीडा महत्त्वाची आहेत. विद्यार्थ्यांनी खेळ आणि नवीन कला आत्मसात कराव्यात. स्नेहसंमेलनातून कलागुणांना वाव मिळतो, असे प्रतिपादन पोलीस निरिक्षक विठ्ठल दराडे यांनी व्यक्त केले. डिगोळ येथील जि.प . प्राथमीक शाळेत नुकत्तेच वार्षीक स्नेहसम्मेलन कार्यक्रम संपन्न झाला त्यावेळी ते बोलत होते. शाळेतील सह शिक्षक टी.डी. बिरादार लिखीत "बदलली नीती, वाढती भीती" या तीन अंकी नाटक विद्यार्थीना सादर केली. यावेळी विद्यार्थ्यांनी याच स्टेजवर देशभक्ती गीत गाऊन विविध नृत्य आणि अभिनय सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमास प्रमूख पाहुणे म्हणून गटशिक्षण अधिकारी आणिल पागे, केंद्रप्रमुख दामाजी बालुरे,कवि आनंत कदम, सरपंच कविता दासरे, जि.प.चे उपाध्यक्ष राम तिरुके, शिक्षक नेते तुकाराम



पाटील, युवा नेते रामेश्वर चावरे, चेअरमन बाबासाहेब पाटील, महेश पोलीस पाटील, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख शिवशंकर पाटील व गावातील प्रतिष्टीत नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शाळेतील सर्व शिक्षक विद्यार्थीनी परिश्रम घेतले. सुत्रसंचलन टी.डी.बिरादार यांनी केले तर उपस्थिताचे आभार मु.अ. इश्वर बिरादार यांनी मानले.

## श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून

### अथर्व जाधवला उच्च शिक्षणासाठी अडीच लाख रुपयांची आर्थिक मदत

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

परदेशातील वैद्यकीय शिक्षणासाठी अथर्व हरीश जाधव याला लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून अडीच लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली. सदरचा धनादेश माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते अथर्वचे वडील हरीश जाधव यांच्याकडे आज (दि. ११) सुपूर्द करण्यात आला. सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रात गेल्या तीन दशकपेक्षा जास्त वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन स्वतः च्या पायावर उभे केले जाते. खारघर येथील अथर्व रशिया देशातील युरल स्टेट मेडिकल युनिर्व्हसिटी मध्ये ही एमबीबीएस हे वैद्यकीय शिक्षण घेणार आहे. त्यासाठी त्यांना आर्थिक मदतीची आवश्यकता होती. त्यानुसार मदत करण्यात आली असून मदतीचा धनादेश माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अथर्वच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी भटके विमुक्त आघाडीच्या महिला अध्यक्षा विद्या तामखेडे, मंडळाचे व्यवस्थापक अनिल कोळी उपस्थित होते.श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या या उपक्रमामुळे अनेक होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मोठी मदत मिळते. अशा प्रकारे समाजातील गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे. त्यामुळे अथर्व जाधवला दिलेल्या या आर्थिक सहाय्यामुळे त्याचे वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न साकार होण्यास मदत होणार आहे.

## प्रभादेवीत‘ शिवदुर्गा ’ सन्मान सोहळा;उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा लाडक्या बहिणींशी संवाद".

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी: मयुर प्रकाश धुरी**

जागतिक महिला दिनानिमित्त मुंबईतील प्रभादेवी येथील रविंद्रनाट्यमंदिर येथे‘शिवदुर्गा’ सन्मान सोहळ्याचे आयोजन शिवसेने मार्फत करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. एकनाथजी शिंदे यांच्या कडून लाडक्या बहिणींशी संवाद साधण्यात आला. उपस्थित महिलांनी शुभेच्छा देत महायुती सरकारच्या पुनरागमनाचा आनंद व्यक्त केला. ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना’ अंतर्गत १५०० रुपये मिळणाऱ्या महिलांना प्रोत्साहन देण्यात आले. तसेच, उद्योजिका आणि कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. सरकार २१०० रुपयांची वाढीव रक्कम देण्याचा विचार करत आहे, आणि योजना कधीही बंद केली जाणार नाही, याची खात्री दिली. कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री मा. ना. एकनाथजी शिंदे,







खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, सौ. वृषाली शिंदे, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, महिला नेत्या मीनाताई कांबळी, उपनेते मा.आमदार सिद्धिविनायक ट्रस्ट अध्यक्ष श्री सदा सरवणकर तसेच मा.नगरसेवक युवा नेतृत्व श्री समाधान सरवणकर व अनेक मान्यवर तथा शिवसेना कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

## श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून

### अथर्व जाधवला उच्च शिक्षणासाठी अडीच लाख रुपयांची आर्थिक मदत

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

परदेशातील वैद्यकीय शिक्षणासाठी अथर्व हरीश जाधव याला लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून अडीच लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली. सदरचा धनादेश माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते अथर्वचे वडील हरीश जाधव यांच्याकडे आज (दि. ११) सुपूर्द करण्यात आला. सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रात गेल्या तीन दशकपेक्षा जास्त वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन स्वतः च्या पायावर उभे केले जाते. खारघर येथील अथर्व रशिया देशातील युरल स्टेट मेडिकल युनिर्व्हसिटी मध्ये ही एमबीबीएस हे वैद्यकीय शिक्षण घेणार आहे. त्यासाठी त्यांना आर्थिक मदतीची आवश्यकता होती. त्यानुसार मदत करण्यात आली असून मदतीचा धनादेश माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी



अथर्वच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी भटके विमुक्त आघाडीच्या महिला अध्यक्षा विद्या तामखेडे, मंडळाचे व्यवस्थापक अनिल कोळी उपस्थित होते.श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या या उपक्रमामुळे अनेक होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मोठी मदत मिळते. अशा प्रकारे समाजातील गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे. त्यामुळे अथर्व जाधवला दिलेल्या या आर्थिक सहाय्यामुळे त्याचे वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न साकार होण्यास मदत होणार आहे.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

## पाईट महाविद्यालयात हिताची ॲस्टेमो फाय कंपनीच्या वतीने आय टी लॅबचे उद्घाटन

**युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ. देवेंद्र ओव्हाळ**
**खेड पुणे**

**पाईट** : येथील कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात चाकण MIDC मधील हिताची अस्टेमो फाय कंपनीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचे शिक्षण मिळावे यासाठी कंपनीच्या सी . एस. आर. उपक्रमांतर्गत तब्बल १८ लक्ष रूपये खर्च करून आय टी लॅब उपलब्ध करून दिली आहे व त्याचे उद्घाटन कंपनीचे सीएमडी श्री. जुनरो उत्सुमी आणि डायरेक्टर श्री. सुधीर गोगटे यांच्या हस्ते करण्यात आले . एकाच वेळी ४० विद्यार्थी संगणकांचा वापर करू शकतील . संगणक, फर्निचर , कक्ष रंगरंगोटी , इंटरनेट लॅन व इलेक्ट्रीक फिटींग सह अदयावत अशी ही माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळा आहे. या प्रसंगी सीएमडी श्री . जुनरो उत्सुमी यांनी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील विविध संधी व मोठे झाल्यावर आपल्या शाळेस तुम्ही मदत करण्यास न विसरण्याचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला . कंपनीचे डायरेक्टर श्री. सुधीर गोगटे यांनी ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात ज्ञान मिळवत आहेत त्याबद्दल समाधान व्यक्त केले व संस्था, ग्रामस्थ व शिक्षकांचे कौतुक केले तसेच भविष्यात ग्रंथालयासाठी भरीव मदतीचे आश्वासन दिले .

आलेल्या पाहुण्यांचे स्वागत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ढोल लेझिमच्या गजरात संस्था अध्यक्ष श्री. जे. बी . खेंगले, उपाध्यक्ष श्री. शामराव रौंधळ व संचालक मंडळ व ग्रामस्थांसमवेत केले. यावेळी कंपनीचे प्रॉडक्शन हेड श्री. ताकामित्सु ओरीकसा, चाकण प्लॉंट हेड श्री. गजानन शेलार, श्री. श्रीकांत मापारी, श्री. युकी सायतो, एच आर हेड श्री. संपत फडतरे, आयटी हेड श्री. परशुराम हम्पी, श्री.हर्षवर्धन चिंधडे, डि . एच . आर . श्री. अमर मगर व दुभाषक योगेश गायकवाड यांचे सह संस्थेचे संचालक मंडळ, ग्रामस्थ तसेच पालक संघाचे उपाध्यक्ष अब्दुल इनामदार व विठ्ठल करंडे उपस्थित होते . या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य आसिर शेख यांनी केले तसेच उपस्थितांचे आभार संस्थेचे मानद सचिव प्रा. गोपीचंद गायकवाड यांनी मानले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सखाराम गिरी यांनी केले .




# होळीच्या निमित्ताने पोस्को महाराष्ट्रचा सृजनशील उपक्रम- वारली चित्रांनी नटली तासगांव आदिवासीवाडी!

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :-सचिन पवार**
**माणगांव रायगड**

माणगांव :-पोस्को महाराष्ट्र स्टीलने त्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व उक्रमांतर्गत पारंपरिक वारली चित्रकलेचा एक प्रेरणादायी आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध उपक्रम तासगाव आदिवासीवाडीत राबवला. यामुळे गावातील सांस्कृतिक परंपरांचे रूप अधिक सजीव झाले आहे. या उपक्रमांतर्गत, समाजमंदिर आणि आजूबाजूच्या ११ घरांच्या भिंती पारंपरिक वारली चित्रकलांनी सुशोभित करण्यात आल्या. आदिवासी जीवनशैली, निसर्गाशी असलेले नाते, तसेच पारंपरिक सण-उत्सवांचे सौंदर्य या कलांमधून सहज उलगडले. यासोबतच, औषधी वनस्पतींच्या




महत्त्वाची पुनर्उजळणी करत परिजातक, वेखंड, अश्वगंधा, तुळस, गवती चहा, कोरफड यांसारख्या वनस्पतींची रोप देण्यात आली. वारली कला ही आदिवासी संस्कृतीच्या समृद्ध वारशाचे प्रतीक आहे आणि या उपक्रमाने तिच्या जतनासाठी एक नवा दृष्टीकोन दिला आहे. १० मार्च २०२५ रोजी या उपक्रमाचे उद्घाटन आदिवासी नृत्याने सुरुवात करत मोठ्या उत्साहात पार पडले. पोस्को महाराष्ट्र स्टीलचे व्यवस्थापकीय संचालक श्री. वू सुक चोई, संचालक श्री. जी युन पार्क आणि इतर वरिष्ठ अधिकारी या सोहळ्याला हजर होते. स्थानिक ग्रामस्थ, विद्यार्थी, आणि महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला, तर कंपनीच्या अधिकाऱ्यांनीही वारली कलेच्या अनुभवामध्ये सहभागी होत आदिवासी संस्कृतीशी जवळीक साधली. गावकऱ्यांच्या भावना या कार्यक्रमात प्रकर्षाने उमटल्या. "या उपक्रमामुळे आमच्या घरांचे रूप पालटून गेले आहे. लुप्त होत चाललेल्या वारली कलेच्या संवर्धनासाठी घेतलेल्या या पुढाकारामुळे मुलांना प्रेरणा मिळेल आणि त्यांना आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग गवसेल," असे त्यांनी त्यांच्या मनोगतातून व्यक्त केले. पोस्को महाराष्ट्र स्टीलने राबविलेल्या या उपक्रमाने गावाचा चेहरामोहराच बदलला नाही, तर वारली कलेच्या जतनाचा आणि संवर्धनाचा एक आदर्श घालून दिला आहे. ग्रामीण संस्कृतीचा अविभाज्य भाग असलेल्या या कलेचा वारसा जपण्यासाठी उचललेले हे पाऊल निश्चितच प्रेरणादायी ठरले आहे. कंपनीने शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संरक्षण आणि स्थानिक संस्कृती संवर्धनासाठी आपल्या सामाजिक जबाबदारीचा मोठा हिस्सा उचलला आहे. "वारली चित्रकलेसारख्या उपक्रमांद्वारे समाजाला प्रेरणा देणे आणि त्यांना एकत्र आणणे हेच आमचे उद्दिष्ट आहे," असे त्यांनी ठामपणे व्यक्त केले. तासगाव आदिवासीवाडीला नवा चेहरा मिळवून देणाऱ्या या उपक्रमाने पोस्को महाराष्ट्र स्टीलचा सामाजिक आणि सांस्कृतिक विकासासाठीचा कटिबद्ध दृष्टिकोन अधोरेखित केला आहे. भविष्यातही अशा सृजनशील उपक्रमांसाठी ते सतत प्रयत्नशील राहतील, यात शंका नाही.

## उल्हासनगर महानगर पालिका द्वारा स्वतःचे मालकीचे धरण तयार

**दैनिक युवक आधार**
**कल्याण/रशीद शेख**

करण्यासाठी प्रयत्न सुरू केली आल्याची बातमी समोर येत आहे.
पॅनल १८ येथील गुरुनानक शाळे जवळ PWD तसेच पाणी पुरवठा विभाग द्वारा नवीन प्रकल्प सुरू. गेल्या काही दिवसा पासून सार्वजनिक बांधकाम विभाग द्वारा अर्धवट सोडून दिलेला रस्त्यामुळे रोज रस्त्यावर पाणी जमा होत आहे. त्यामुळे शाळेतील मुलांना तसेच वाहनांना त्याचा परिणाम होत असून सदर पाणी हे नवीन बांधण्यात आलेल्या ड्रेनेज लाईन मधून वाहत आल्याचे समजले जात असून सार्वजनिक बांधकाम विभाग चे अभियंता सेवकांनी तसेच पाणी पुरवठा विभागाच्या अभियंता मिरकुटे यांना तक्रार दिले असून त्वरीत या वर उपयोजना केली जाईल असे आश्वासन देण्यात आले आहे.



अड प्रशांत चंदनशिव यांनी केली आहे

## जागतिक महिला दिनानिमित्त धर्माबाद शहरात नारीशक्तीच्या वतिने भव्य रॅली संपन्न

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी :**
**गिरमाजी सुर्यकार**

नारीशक्ती धर्माबाद च्या वतिने दिनांक 10 मार्च रोजी धर्माबाद शहरात जागतिक महिला दिनानिमित्त महिला व युवतींची भव्य रॅली संपन्न झाली आहे. या रॅलीत युवतींचे एनसीसी पथक,लेझिम पथक, कराटे पथक, सहभागी झाले होते. राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब, स्त्रियांना प्रथमतः शिक्षण सुरू करणाऱ्या सावित्रीबाई फुले,पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रम सुरू झाला. सहभागी महीला व युवतींना गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सहभागी झालेल्या महिला व युवतींनी पोलीस ठाण्या पासून ते हुतात्मा पानसरे चौक, नरेन्द्र चौक, पोलीस ठाणे अशा प्रमुख मार्गावरून ही रॅली काढण्यात आली. यात मशाल हाती घेऊन युवतीं सहभागी



होते. सदरील रॅलीत मी सावित्री बोलतेय ही एकांकीका सादर करण्यात आली. क्रीडा कराटे प्रशिक्षण विभागाचे मार्गदर्शन सितावार सर,कराटे पथक प्रदर्शित विद्यार्थी विद्यार्थिनी वतिने करण्यात आले.अतीशय शिस्तीत ही रॅली संपन्न झाली. यात अनेक शाळेचे विद्यार्थिनी,शिक्षिका व विविध क्षेत्रातील महिला सहभागी झाल्या होत्या. पोलिस निरीक्षक बाळासाहेब रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक प्रियंका पवार मॅडम यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.तसेच ही रॅली यशस्वी होण्यासाठी वाहतूक पोलिस आणि इतर पोलीस बांधवांनी परिश्रम घेतले. या रॅलीत हुतात्मा पानसरे शाळा, कस्तुरबा गांधी विद्यालय,गुरुकुल विद्यालय, जिजामाता शाळा आदी शाळेनी सहभाग घेतला होता.

## वाकद वासीयांच्या उपोषणास माजी मंत्री अनंतराव देशमुख यांची भेट




**दैनिक युवक आधार**
**तालुका वार्ताहर**
**रणजीत सिंग ठाकूर**

रिसोड तालुक्यातील वाकद येथील सरपंच अमोल देशमुख यांच्या नेतृत्वात वाकद येथील नागरिकांनी जल जीवन मिशनचे पाणी धरणावरून सर्व नागरिकास मिळावे यासाठी मागील 30 दिवसापासून जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम येथे सुरू असलेल्या उपोषणास माजी मंत्री तथा माजी खासदार श्री अनंतराव देशमुख यांनी भेट दिली. या भेटीदरम्यान माननीय अनंतरावजी देशमुख साहेब यांनी वाशिम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री वैभव वाघमारे जिल्हाधिकारी श्रीमती भुवनेश्वर व एम. एस. ई.बी .चे अभियंता यांच्याशी भ्रमणध्वनी द्वारे चर्चा केली. या चर्चेदरम्यान वरिष्ठ अधिकाऱ्यांनी श्री देशमुख यांना सांगितले की 18 ते 20 मार्च 2025 पर्यंत वाकद येथील सर्व नागरिकांना प्रत्येकाच्या घरी जलजीवन मिशनच्या माध्यमातून नळाच्याद्वारे पाणी मिळण्याची निश्चित व्यवस्था केली जाईल. तसेच वाकद वासीयाच्या मागील 30 दिवसापासून सुरू असलेल्या उपोषणास निश्चिती यश मिळेल अशी ग्वाही श्री अनंतराव देशमुख वरिष्ठ अधिकारी वर्गाशी चर्चा केल्यानंतर वरिष्ठ अधिकारी वर्गाशी चर्चा केल्यानंतर उपोषण कर्त्यांना दिली दिली. या भेटीमुळे उपोषणकर्त्यांनी समाधान व्यक्त केले.

## सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील भरीव योगदान; सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर यांचा 'यमुना स्त्री सन्मान' पुरस्काराने सन्मान

**दैनिक युवक आधार**
**सुरेश भोईर (कार्यकारी संपादक )**

पनवेल (प्रतिनिधी) स्त्रिया म्हणजे केवळ माया, ममता आणि कुटुंबाचा आधार नाहीत, तर त्या जिद्द, मेहनत आणि कर्तृत्वाची मूर्तिमंत प्रतीक आहेत. इतिहासात तसेच आजच्या आधुनिक युगातही अनेक महिलांनी विविध क्षेत्रांत आपले नाव कोरले आहे. स्त्रिया फक्त घर सांभाळणाऱ्या किंवा समाजातील पारंपरिक भूमिका निभावणाऱ्या व्यक्ती नाहीत, तर त्या समाजाच्या प्रगतीचे आणि विकासाचे मुख्य आधारस्तंभ आहेत. त्यामध्ये आदरणीय व्यक्तिमत्व सौ. शंकुतला रामशेठ ठाकूर यांचे शैक्षणिक आणि सामाजिक कार्य नेहमीच प्रेरणादायी राहिले आहे. त्या अनुषंगाने काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या मातोश्री दिवंगत यमुनाबाई तुकाराम घरत यांच्या अकराव्या स्मृतिदिनानिमित्त यमुना शैक्षणिक सामाजिक व शैक्षणिक संस्थेच्या




वतीने शेलघर येथे आज (दि. ११) संपन्न झालेल्या 'कर्तृत्वान महिलांचा सन्मान' सोहळ्यात सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्या हस्ते सौ. शंकुतला रामशेठ ठाकूर यांचा सामाजिक व शैक्षणिक कार्यासाठी 'यमुना स्त्री सन्मान' पुरस्काराने समारंभपुर्वक सन्मान करण्यात आला. दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सन्मान सोहळ्यास प्रमुख मान्यवर म्हणून सिनेअभिनेत्री मृणाल कुलकर्णी, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, दिबासाहेबांचे चिरंजीव अतुल पाटील, शिवसेनेचे संपर्क प्रमुख बबन पाटील, शिक्षकनेते दा.चा.कडू गुरुजी, संस्थेचे संस्थापक महेंद्र घरत, सचिव शुभांगी घरत, राम म्हात्रे, रघुनाथ घरत, राजेंद्र पडते, डॉ. मनीष पाटील, मिलिंद पाडगावकर, कामगारनेते वैभव पाटील, किरीट पाटील, आदी उपस्थित होते. थोर देणगीदार लोकनेते रामशेठ ठाकूर व कुटुंबियांनी रयत शिक्षण संस्थेच्या विकासासाठी सातत्याने भरीव मदत करून या संस्थेच्या प्रगतीसाठी नेहमीच मोलाचा हातभार लावला आहे. आजपर्यंत १०० कोटीहून अधिक रुपयांची देणगी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रयत शिक्षण संस्थेला दिली आहे. कर्मवीर अण्णांच्या विचाराने प्रेरित होऊन त्यांचा शैक्षणिक वारसा जपण्याचे कार्य लोकनेते रामशेठ ठाकूर अखंडपणे करत आहेत.लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विधायक कामाला प्रोत्साहन देण्यासाठी नेहमी मुक्तहस्ते मदत केली आहे, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात असलेल्या विद्यालयांना उभारी देण्याचे काम त्यांनी केले आहे. थोर समाजसुधारक स्वर्गीय जनार्दन भगत यांची कन्या आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांनी रयत शिक्षण संस्थेला कोट्यवधी रुपयांची देणगी दिली आहे. तसेच शिक्षण क्षेत्रासह सामाजिक क्षेत्रात सौ. शकुंतला ठाकूर यांचे कार्य उल्लेखनीय असे आहे. चांगले विचार स्वतः आणि इतरांना घडविण्याचे काम करते. जन्माला येताना आणि मृत्यूनंतर खाली हात जावे लागते. माणुसकी आणि विचार अमर असतात. शैक्षणिकदृष्ट्या समाजाच्या विकासासाठी सर्वांनी सामाजिक कार्यात स्वतःला वाहून देणे गरजेचे आहे आणि याच सामाजिक भावनेतून लोकनेते रामशेठ ठाकूर व कुटुंबिय कार्य करीत असतात. समाजाचे आधारस्तंभ असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर राहिले आहेत आणि त्याचबरोबरीने त्यांच्या अर्धांगिनी सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर यांनीही सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात स्वतःला झोकून दिले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या विधायक कार्यात सौ. शकुंतला ठाकूर यांचा मोलाचा वाटा आहे. त्याबद्दल त्यांचा यमुना शैक्षणिक सामाजिक व शैक्षणिक संस्थेच्या वतीने गौरव करण्यात आला.

**'यमुना स्त्री सन्मान' पुरस्कार' ने यांचा झाला सन्मान**

सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर (सामाजिक व शैक्षणिक),
सुप्रसिद्ध अभिनेत्री मृणाल कुलकर्णी (कला )
प्रमदा बिडवे (प्रशासन )
डॉ. शीतल जोशी (वैद्यकीय )
डॉ. समिधा गांधी (वैद्यकीय )
डॉ. कीर्ती समुद्र (वैद्यकीय )
डॉ. प्रकाश निघूकर (वैद्यकीय )
डॉ. जिज्ञासा विजय कडू (वैद्यकीय )
सुरेखा म्हात्रे (शैक्षणिक )
अनुराधा उरसल (क्रीडा)
रिया पाटील (क्रीडा)
प्राची ठाकूर (कला )

## टाटा टेक्नोलॉजीचे संघटनात्मक परिवर्तन 'वन टीम विथ कस्टमर्स' विस्तारित रणनीती

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, वार्ताहर**

११ मार्च २०२५ : टाटा टेक्नोलॉजीज, एक जागतिक उत्पाद अभियांत्रिकी आणि डिजिटल सेवा कंपनी, यांनी आज त्यांच्या सुधारित धोरणाची आणि प्रमुख नेतृत्व बदलांची घोषणा केली आहे. हा बदल 'वन टीम विथ कस्टमर्स' दृष्टिकोनाला अधिक सशक्त करण्यासाठी आणि सॉफ्टवेअर-डिफाइंड युगात स्वतःला प्राधान्य भागीदार म्हणून स्थापित करणे आहे. हे धोरणात्मक परिवर्तन ऑटोमोटिव्ह, इंडस्ट्रियल हेवी मशिनरी आणि एरोस्पेस क्षेत्रातील ग्राहकांच्या गरजांनुसार योग्यता, कार्यक्षमता आणि सतत वाढ सुनिश्चित करेल. जागतिक अभियांत्रिकी, संशोधन आणि विकास बाजारपेठ मोठ्या दीर्घकालीन संधी प्रदान करतो, ज्याचा एकूण संभाव्य बाजार ऑटोमोटिव्ह, इंडस्ट्रियल हेवी मशिनरी आणि एरोस्पेस क्षेत्रांमध्ये २६०-३०० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचू शकतो. हे क्षेत्र विद्युतीकरण,




सॉफ्टवेअर-डिफाइंड वाहने आणि स्मार्ट उत्पादन तंत्रज्ञानामुळे वेगाने परिवर्तनाच्या टप्प्यात आहेत. सध्या ६०-७० अब्ज डॉलर्सच्या मूल्याच्या बाहय स्रोत अभियांत्रिकी, संशोधन आणि विकास बाजारपेठेची वार्षिक वाढ (CAGR) १०-१२% आहे, जी सॉफ्टवेअर-आधारित उपायांसाठी वाढत्या मागणीमुळे, वेळबद्ध उत्पादन विकासाच्या गरजेने आणि विशेष अभियांत्रिकी प्रतिभेने प्रेरित आहे. ऑटोमोटिव्ह क्षेत्र, जो या बाजारपेठेचा सर्वात मोठा घटक आहे. बॅटरी इलेक्ट्रिक वाहने (BEV), सॉफ्टवेअर-डिफाइंड वाहने आणि संपूर्ण वाहन विकास कार्यक्रमांचा स्वीवेगाने स्वीकार करत आहे. ज्यासाठी ३५-४० अब्ज डॉलर्स इतका खर्च होत आहे. तसेच, एरोस्पेस आणि इंडस्ट्रियल हेवी मशिनरी क्षेत्र प्रगत प्रणोदन तंत्रज्ञान, एमआरओ उपाय, पर्यायी इंधन आणि स्मार्ट कारखान्यांच्या माध्यमातून विकसित होत आहेत, ज्यामुळे १६-१८ अब्ज डॉलर्सच्या वाढत्या बाहय स्रोत जागतिक अभियांत्रिकी, संशोधन आणि विकास बाजारात योगदान देत आहेत.

**टाटा टेक्नोलॉजीजच्या विकसित धोरणाचे चार प्रमुख स्तंभः**

1) उच्चतम ग्राहकांशी संबंध दृढ करणेः टाटा मोटर्स, जेएलआर आणि आघाडीच्या जागतिक ओईएम आणि टियर-१ पुरवठादारांसोबत संबंध मजबूत करण्यासाठी समर्पित समर्पित खाते संघाद्वारे स्थापन केल्या आहेत, ज्यामध्ये क्लायंट पार्टनर्स, डिलिव्हरी पार्टनर्स आणि ट्रान्सफॉर्मेशन पार्टनर्स यांचा समावेश आहे.

2) बाजारपेठ प्रवेशाला गती देणेः कनेक्टिव्हिटी, स्वायत्तता आणि IoT-सक्षम परिसंस्थेच्या विस्तारासाठी पूर्ण-वाहन अभियांत्रिकी, एम्बेडेड सिस्टीम्स, स्मार्ट उत्पादन उपाय आणि हार्डवेअर-सॉफ्टवेअर अभिसरण सक्षम करणे आहे.

3) एम्बेडेड आणि सॉफ्टवेअर-संचालित क्षमतांचा विस्तार करणेः यांत्रिक आणि एम्बेडेड प्रणाली एकत्रित करण्यासाठी एआय, डिजिटल सेवा आणि एसडीवी नवोपक्रम वाढवणे, ज्यामुळे एंड-टू-एंड उत्पादन विकास क्षमता मजबूत होईल.

4) गो-टू-मार्केट दृष्टिकोनात परिवर्तन करणेः मोठ्या करारांची क्षमता, विक्री सक्षमीकरण, उपाय प्रवेगक आणि उत्पाद सॉफ्टवेअर व सेमीकंडक्टर कंपन्यांसोबत धोरणात्मक भागीदारी मजबूत करणे.

श्री. वॉरेन हॅरिस, सीईओ आणि एमडी, टाटा टेक्नॉलॉजीज म्हणाले,"एक चांगले जग निर्माण करण्याचे आमचे स्वप्न, नवीन सॉफ्टवेअर-परिभाषित युगात यशस्वी होण्यासाठी आमच्या ग्राहकांना सक्षम करणारे नाविन्यपूर्ण उपाय प्रदान करण्यावर आधारित आहे. त्यांनी पुढे सांगितले, नवीन गो-टू-मार्केट दृष्टिकोन आमच्या ग्राहक-केंद्रित नाविन्य, लवचिकता, आणि AI-नेतृत्वाखालील अभियांत्रिकी उत्कृष्टतेबद्दलच्या वचनबद्धतेला बळकटी देते. आमच्या नेतृत्व टीमला बळकट करून आणि एम्बेडेड सॉफ्टवेअर, एसडीव्ही , एरोस्पेस, आणि आयएचएमवर लक्ष केंद्रित करून, आम्ही टाटा टेक्नॉलॉजीज आणि आमच्या ग्राहकांसाठी वाढीच्या पुढील टप्प्याला चालना देण्यासाठी स्वतःला सुसज्ज करत आहोत."

## दिवेकरांनी थकीत पाणीबीलासाठी अभय योजनेचा घ्या लाभ – सहायक आयुक्त.

**थकीतबीलाच्या दंडात्मक रकमेवर ३१ मार्च पर्यंत १००% सूट...**

**दैनिक युवक आधार**
**अमित जाधव -वार्ताहर**

ठाणे, दिवा ता ११ मार्च : ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील थकीत घरगुती पाणीबिलावर प्रशासकीय आकारामध्ये १०० टक्के सूट देणारी अभय योजना जाहीर करण्याचा महत्वपूर्ण निर्णय महापालिका आयुक्त सौरव राव यांनी घेतला आहे. थकीत पाणीपट्टी बिलावरील १०० टक्के दंड माफ करण्याची ठाणे मनपाची अभय योजना जाहिर करण्यात आल्याने नागरिकांना आर्थिक दिलासा मिळणार असून सदर अभय योजनेची सवलत ३१ मार्च पर्यंत असून योजनेचा लाभ नागरिकांनी तात्काळ घ्यावा असे आवाहन दिवा प्रभाग समितीचे सहायक आयुक्त राजेंद्र गिरी यांनी केले आहे.

सदर अभय योजनेचा लाभ दिवा शहरातील पाणीपट्टी थकबाकीदारांना 31 मार्च 2025 पर्यतच्या थकीत पाणीपट्टी कराच्या दंडाची रक्कम पूर्णतः माफ करुन भरीव सूट देणारी थकबाकीदारांसाठी लाभदायी अशी ही योजना आहे. ही रक्कम थकबाकीदारांनी एकाचवेळी भरणा करावयाची असून ती टप्प्याटप्यांनी भरता येणार नाही तसेच सदर अभय योजनेच्या कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारची मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे 31 मार्च 2025 पर्यत नागरिकांनी पाणीबिलाची थकीत रक्कम भरणा करुन या योजनेचा लाभ घेण्याची सुवर्णसंधी मिळाली असून पालिकेच्या या धोरणात्मक निर्णयामुळे ज्या घरगुती संयोजनधारकांनी पाणीपट्टी जमा केली नसेल




अशा घरगुती नळसंयोजनधारकांनाच सदरची योजना लागू असणार आहे तसेच व्यावसायिक नळसंयोजन धारकांनाही ही सवलत लागू असणार नाही. तर १ एप्रिल २०२५ पासून थकबाकी प्रलंबित ठेवणाऱ्या बिल धारकावर जप्तीची ठोस कारवाई करण्यात येईल असे दिवा प्रभाग समितीचे सहायक आयुक्त यांनी बोलताना स्पष्ट केल आहे.

# जनसेवेसाठी मी पाहिलेली स्वप्ने पूर्ण होतात ; आता एम.बी.बी.एस.कॉलेजचे स्वप्न -- किशोर जैन

## 60 व्या वाढदिवसानिमित्त आयुर्वेदिक रुग्णालयचे लोकार्पण व महाआरोग्य शिबिर

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे : महेंद्र माने**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) रायगड जिल्हा सहसंपर्क प्रमुख तथा भारतीय एज्युकेशन विद्यासंकुनचे संस्थापक अध्यक्ष किशोर जैन यांच्या 60 व्या वाढदिवसानिमित्त सोमवार 10 मार्च रोजी सरपंच सुप्रिया महाडिक, मा.सरपंच डॉ.मिलिंद धात्रक,संस्थेचे सीईओ कार्तिक जैन,उपसरपंच अकलाक पानसरे,विभागप्रमुख संजय भोसले,उपविभागप्रमुख संजय महाडिक, प्राचार्या डॉ. ज्योती जगताप,ग्रा.पं.सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे यांच्या प्रमुख उपस्थितीत किशोर जैन यांच्या हस्ते झालेल्या श्रीमती शांतीबाई ओटरमल जैन आयुर्वेदिक रुग्णालय लोकार्पण व मोफत महाआरोग्य शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी मी जनसेवेसाठी पाहिलेले स्वप्ने



पूर्ण होतात आता एम.बी.बी.एस मेडिकल कॉलेजचे स्वप्न असून ते लवकरच पूर्ण होणार असल्याचे प्रतिपादन किशोर जैन यांनी केले. या महाशिबिराचा लाभ साधारण 180 रुग्णांनी घेतला. सुसज्ज व सर्व आरोग्यविषयक सुखसोयींनी सज्ज असलेल्या आयुर्वेदिक रुग्णालयाचे लोकार्पण व महाआरोग्य शिबिराचे उद्घाटन झाल्यानंतर झालेल्या वाढदिवस कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करताना किशोर जैन यांनी सांगितले की, मला आज पर्यंत मिळालेल्या आयुष्यात मनात ठरविलेली जनसेवेची कामे बाळासाहेबांच्या शिकवणीनुसार 80% समाजकारण 20% राजकारण या प्रमाणे पूर्ण केली आहेत. येथील अदिवासी व ग्रामीण भागातील जनतेसाठी एक अत्याधुनिक रुग्णालय असावा ही माझी संकल्पना पूर्ण झाली आहे. मला मिळालेले यश व केलेल्या संकल्पनेला जनतेचे आशीर्वाद व ईश्वराची साथ असते.मला जे जे यश मिळाले त्यात मी समाधानी नसून पुढील मिळणाऱ्या यशासाठी वयोमानानुसार वेग वाढविणार आहे. आपल्या मेडीकल कॉलेजचेचे नाव जगातील आयुर्वेदिक मेडिकलच्या लिस्टमध्ये गेले आहे. परदेशी नागरिकाला उपचार घ्यायचे असेल तर त्याला आपल्या कॉलेजच्या नावाने व्हिसा मिळते. कॉलेजचे महत्व आपल्या लोकांना समजून त्याचा उपयोग त्यांनी करून घ्यायला पाहिजे. कॉलेजमध्ये येथील विद्यार्थ्यांना नीट मध्ये चांगले मार्क न मिळाल्याने प्रवेश मिळाला नसल्याचे दु;ख असून प्रवेशासाठी नीटमध्ये चांगले मार्क काढा; काही अडचण असेल तर माझ्याजवळ बोलू शकता. या कॉलेजमधुन झालेले डॉक्टर क्लास वनचा ऑफिसर असतो. तसेच येथील रुग्णालयात अतिशय चांगले उपचार होतात त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा. देवाची साथ असल्याने मी पाहिलेल्या सर्व सात स्वप्नात यशस्वी झालो असल्याचे सांगून आता माझे स्वप्न एम.बी.बी.एस.कॉलेजचे असून तेही लवकरच पूर्ण होणार असल्याचे माझ्या 60 व्या वाढदिवशी जाहीर करीत असल्याचे शेवटी जैन यांनी सांगितले.या महाआरोग्य शिबिराचा लाभ साधारण 180 रुग्णांनी घेतला. यावेळी संगीता जैन,सुरेश जैन, प्रकाश जैन, प्रियांका जैन, उदय भिसे, गणपत म्हात्रे, संजय काकडे, पिंटू दोशी,बळीराम बडे,राजू टेमकर,राकेश टेमघरे, सुप्रिया काकडे, भाविका गिजे,अमृता महाडिक, ज्योती राऊत,सविता धामणसे,धनंजय जगताप,लियाकत कडवेकर, असगर मुल्ला, विजय शहासने, जितेंद्र धामणसे,चंद्रकांत अडसुळे, चंद्रकांत दुर्गावले विद्यासंकुलचे वैभव नांदगावकर,अनघा सामंत,समीर पवार,राजेश सुतार यांच्यासह सर्व विभागाचे प्राचार्य, रुग्णालयातील डॉक्टर,शिक्षक,कर्मचारी, विद्यार्थी तसेच किशोर जैन यांचे नातेवाईक व मित्रपरीवार उपस्थित होते.

# शब्दपूर्ती करणारा समतोल अर्थसंकल्प : खा. अशोक चव्हाण

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड-** यंदाच्या महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात आर्थिक आव्हानांना योग्य प्रकारे हाताळून सरकारने दिलेल्या प्रत्येक शब्दाची पुर्ती करणारा एक उत्तम, समतोल अर्थसंकल्प सादर केल्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण यांनी म्हटले आहे. पानिपत येथे युद्ध स्मारक, आग्रा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचे व संगमेश्वर येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मारकाच्या घोषणा लोकांची मने जिंकणारी नाहे. शेतकरी, महिला, युवक आदी समाजघटक आणि उद्योग, गुंतवणूक, शिक्षण, नारोग्य, सहकार आदी क्षेत्रावर भर दिला आहे. विशेषतः अवघ्या पाच किलोमीटरच्या रिघात आरोग्य सेवा देण्याची घोषणा भविष्याचा वेध घेणारी असल्याचे ते म्हणाले.

# कलाशिक्षक घाडगे सर यांचा 'पर्सन ऑफ द इयर पुरस्काराने सन्मान

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

श्री छत्रपती हायस्कूल सणसरचे कलाशिक्षक श्री. परशुराम हरिदास घाडगे सर यांना 'सामाजिक सेवाभावी संस्था'"आदर्श फाउंडेशन सांगली " यांच्यावतीने शनिवार दिनांक 8 मार्च 2025 रोजी कोल्हापूर या ठिकाणी "पर्सन ऑफ द इयर 2025" या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.हा पुरस्कार समारंभाचे अध्यक्ष माजी शिक्षक आमदार श्री भगवानराव साळुंखे सर प्रमुख पाहुणे माननीय निवेदिता माने माजी खासदार कोल्हापूर माननीय एम के गोंधळी सर निवृत्त शिक्षण सहसंचालक यांचे शुभहस्ते देण्यात आला.तसेच दुसरा पुरस्कार आज रविवार दिनांक 9 मार्च 2025 रोजी "कला साधना सामाजिक संस्था व ग्लोबल गोल्ड टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड" नवी मुंबई याचे वतीने श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचे जयंती निमित्त तसेच आंतरराष्ट्रीय जागतिक महिला दिनानिमित्त"राज्यस्तरीय फलक लेखन स्पर्धेमध्ये "तृतीय क्रमांक' मिळविला.आज हा पुरस्कार नवी मुंबई या ठिकाणी पद्मश्री नयना आपटे सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री यांच्या शुभहस्ते देण्यात आला.त्याबद्दल श्री परशुराम हरिदास घाडगे सर यांचे श्री. छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री. प्रशांत दादा काटे तसेच व्हॉइस चेअरमन श्री.अमोलदादा पाटील, संचालक अड.रणजीत भैय्या निंबाळकर,
डॉ.दीपक निंबाळकर सर्व संचालक,त्याच प्रमाणे सणसर गावचे नूतन सरपंच श्री.यशवंत दिलीप नरुटे पाटील,सर्व ग्रामपंचायत सदस्य ग्रामसेवक सचिन पवार आणि श्री.छत्रपती हायस्कूल सणसरचे मुख्याध्यापक श्री. सर्जे एस.डी.सर सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांचे वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात आले.




# पेण खारेपाट विभागातील ग्रामस्थ थेट हेटवणे धरणावर धडकले धरणाच्या कालव्याच्या पाण्यात उतरून आंदोलन

## धरणाच्या पाण्यावर सर्वप्रथम हक्क आमचाच - नंदा म्हात्रे

**दैनिक युवक आधार**
**पेण प्रतिनिधि**

गेली अनेक दशके उलटून गेली तरी पेण तालुक्यातील खारेपाट भागतील ग्रामस्थांना पिण्याचे पाणी मिळत नाही. अनेक आंदोलने, उपोषणे झाली तरी आजतागायत या ग्रामस्थांना पिण्याचे पाणी मिळत नसल्याने अखेर आज ग्रामस्थांनी थेट तालुक्यातील हेटवणे धरणावर जाऊन कालव्यामधील पाण्यात उतरून जल आंदोलन केले. यावेळी ग्रामस्थ नंदा म्हात्रे यांनी या धरणाच्या पाण्यावर सर्वप्रथम आमचा हक्क असून तो हक्क मिळवल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही असे जाहीर केले. नवी मुंबईला हेटवणे धरणाचे जाणारे पाणी रद्द करावे, जल बोगद्याचा मंजुरी प्रस्ताव रद्द करण्यात



यावा, लवकरात लवकर कार्यारंभ आदेश देण्यात यावेत आदी मागण्या घेऊन या ग्रामस्थांनी आज हेटवणे धरणावर जल आंदोलन केले. यावेळी खारेपाट विभागातील आंदोलनकर्त्या नंदा म्हात्रे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, हेमंत पाटील, सी आर म्हात्रे, राजन झेमसे, राजेंद्र म्हात्रे, बळीराम भोईर यांसह ग्रामस्थ उपस्थित होते. पेणच्या खारेपाट भागासाठी 767 कोटी रुपये शासनाकडून मंजूर करण्यात आले आहेत, मात्र आज चार महिने झाले तरी कार्यारंभ आदेश देण्यात आले नाहीत. आता मार्च अखेर नंतर जरी हा कार्यारंभ आदेश आला तरी पावसाळा येईपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही, त्यामुळे यावर्षी सुद्धा आमच्या खारेपाट भागाला पिण्याचे पाणी मिळणे कठीण आहे आणि याला सर्वस्वी जबाबदार येथील लोकप्रतिनिधी आहेत याची आम्हाला लाज वाटते. मात्र आज आम्ही प्रशासनाला नोटीस देऊन या हेटवणे धरणावर जल आंदोलन केले असले तरी यापुढे कोणतीही पूर्वसूचना न देता आम्ही येथे येऊन जलसमाधी घेऊ अशा प्रकारचे सडेतोड उत्तर खारेपाट विभागातील रणरागिणी नंदा म्हात्रे यांनी दिला आहे.

> सदर प्रकल्पाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. शासन स्तरावर प्रस्ताव देखील पाठवला आहे. कामाची मंजुरी मिळाल्यानंतर कालव्याचे काम सुरु होईल.
> **आर एस कापाले, सहाय्यक अभियंता श्रेणी**

> शेती सिंचन प्रकल्पाबाबत जो सेवा हमी कायदा आहे त्यात ज्या अधिकाऱ्यांनी दप्तर दिरंगाई केली आहे त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी आणि जोपर्यंत आम्हाला पिण्याचे आणि सिंचनाचे पाणी मिळत नाही तोपर्यंत आमचे हे आंदोलन सुरूच राहील.
> **प्रकाश माळी, अध्यक्ष - खारेपाट विभाग संकल्प विकास संघटनना**

# अखेर अरूणोदय झाला

**(कथा कविमित्र अरूण झगडकरची)**

**दैनिक युवक आधार-** काळजातील मित्र मायेचे छत्र कचरू चांभारे लिखित लेखमाला *दैनिक युवक आधारने* सुरू केली आहे यातील द्वितीय लेख
झगडणं हा शब्द भांडण शब्दाशी मिळताजुळता असला तरी दोहोंत कमालीचा भेदग आहे.भांडण हे क्षणिक असतं तर झगडणं हे दीर्घकालीन असतं. चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्याच्या पूर्व सीमेवर पोंभुर्णा तालुका आहे.त्या तालुक्यात झगडकर रिठ नावाचं दहा पंधरा घरांची वस्ती असलेलं छोटंसं गाव आहे. दहा पंधरा घरातली निम्म्याहून अधिक घरं झगडकर आडनावाची म्हणून रिठ गावची ओळख झगडकर रिठ अशी.या वस्तीत कुणीही श्रीमंत नाही,कुणी मोठा बागायतदार शेतकरी नाही. गावाच्या जवळच वाहता नाला, त्याला लागूनच मोठा डोंगर व दुसऱ्या बाजूला वैनगंगेचे विशाल पात्र.जेमतेम पोटापुरती भातशेती बाकी नियतीशी झगडणं चालूच. म्हणून तर वस्तीचे नाव झगडकर रिठ असेल का ?

या झगडकर कुटुंबात संपत्तीचा,मानमर्यादेचा,ज्ञानाचा अरूणोदय झाला तो अरूण झगडकर गुरूजींच्या रूपात. त्यांचीच कथा आपण वाचत आहोत.चंद्रपूर जिल्ह्याचा आदर्श शिक्षक पुरस्कार,झाडीबोली साहित्य मंडळाचे जिल्हा अध्यक्ष, नानाविध संस्थांनी गौरविलेले अरूण झगडकर गुरूजी आज गोंडपिंपरी येथे स्थायिक आहेत.गुरूजींचा इतिहास रंजक व संघर्षमय आहे. मध्य प्रदेशातून वाहत येणारी वैनगंगा नदी महाराष्ट्रात प्रवेशती झाल्यावर गोंदिया भंडारा, नागपूर भंडारा, गडचिरोली भंडारा व चंद्रपूर गडचिरोली असं सीमा विभाजन करत धावते.चंद्रपूर गडचिरोली सीमेवर तिचं पात्र फार रूंद आहे.वर वर्णनात आलेले रिठ हे गाव वैनगंगेच्या काठावर आहे.गाव अगदीच छोटं , दहा पंधरा घरांची वस्ती. 1980 पूर्वी गावात एकच व्यक्ती जेमतेम चौथा वर्ग शिकलेली. बाकी मग पिढ्यान् पिढ्या तोच अंधार अज्ञान व निरक्षरतेचा. माता कौशल्या व पिता वासुदेव यांच्या पोटी १५ एप्रिल १९७३ रोजी प्रस्तुत नायक अरूणचा जन्म झाला.ते दिवस वसंत पालवीचे होते.उन्हाची तीव्र झळाळी असली तरी वसंतात सृष्टीला कोवळीक फुटतेच. हा नवजात बालक अरूण म्हणजे झगडकरांचे दारिद्रय मिटविण्यासाठी आलेला धनदूतच. कौशल्या-वासुदेव झगडकर कुटंबात एकुण सहा अपत्ये. धानाचं (भाताचं) एक पीक देणारी थोडी शेती,बाकी सारं बेताचंच. वस्तीत शाळा नाही, शैक्षणिक जागृती नाही.कोणत्याही कोनातून शैक्षणिक सुगंध वाहत येईल ,अशी हवाच नाही.पण जिथं पूर्णतः प्रतिकुलता असते ते बदलण्यासाठी नियतीची एक ठाम योजना असते अन् झगडकरांसाठी ही योजना म्हणजे अरूण.त्याला शाळेची आवड कशी निर्माण झाली ? हे एक कोडेच आहे. रिठपासून तीन किमी अंतरावर चकठाणा नावाचे छोटे गाव आहे.तिथल्या प्राथमिक शाळेत इयत्ता पहिलीत अरूण वासुदेव झगडकर हे नाव प्रविष्ट झाले.देश व राज्य नवनिर्मित झाल्यानंतर सरकारी दस्ताऐवजात नोंदवलेलं हे झगडकरांचे पहिले नाव. या नावाला सिद्ध होण्यासाठी खूप कष्ट पडणार होते पण ते अजून नियतीच्या पोटात होते.रिठ गाव वस्तीच्या एका बाजूने डोंगररांग असल्यामुळे , पावसाळ्यात डोंगरावरून फुटलेले ओढे वैनगंगेकडे धावत असतात.धावताना हे ओढे छोट्या अरूणला आडवे येत पण त्याने शाळेत जाण्याची चिकाटी सोडली नाही.वर्ग पहिलीचा,वय जेमतेम पाचसहा वर्ष पण तरीही हा बालक धिटाईने पाच-सहा किमी दररोज पायी जाऊन शिकत होता.याच पाऊलखुणांत भविष्य इतिहासाचे डोहाळे दडलेले होते. कालांतराने थोरल्या बहिणीला व आणखी एकाला सोबत घेऊन ऐंशीच्या दशकात रिठच्या तिघांनी प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. पाचवी ते सातवी पर्यंतचे शिक्षण बोर्डा बोरकर व आठवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण नवेगाव मोरे इथे पूर्ण केले.प्राथमिक,उच्च प्राथमिक व माध्यमिक शिक्षण तीन गावात पूर्ण केले पण दहा वर्षांची पायपीट एकदाही चुकली नाही,तीनही गावं रिठपासून पाच सहा किमी अंतरावर होती.

1990 साली अरूण दहावी उत्तीर्ण झाला तेव्हा तो झगडकर रिठ गावचा दहावी उत्तीर्ण झालेला पहिला तरूण होता.पुस्तकाच्या मैदानातला हा गडी खेळाच्या मैदानातही तसाच तगडा होता.नागपूरला झालेल्या शालेय



विभागीय क्रीडा स्पर्धेत त्याने सहावीला असतानाच कबड्डी संघाचे चंद्रपूर जिल्हा प्रतिनिधित्व केले होते.पहिली ते दहावी रोजची सरासरी दहा किमी पायपीट गृहित धरली व वर्षभराचे शालेय दिवस दोनशे गृहित धरले तर अरूणने पहिली ते दहावी या दहा वर्षात कापलेले अंतर तब्बल वीस हजार किमी भरते. पुढे त्याने अकरावीला बेंबाळ येथील आनंद महाविद्यालयात अकरावीला प्रवेश घेतला. स्वग्राम ते बेंबाळ हे अंतर बारा किमीचे आहे.पण यावेळी समाधानाची बाब म्हणजे आता ये जा करण्यासाठी सायकल होती. बारा किमी जाणं व येणं सायकलवर जा ये असली तरी ते सोपं नव्हतंच.दोन वर्षातलं हे अंतर भरतं ९६०० किमी. म्हणजेच बारावी उत्तीर्ण अरूणची पाऊले भौगोलिकदृष्ट्या तीस हजार किमी चालली होती. हे सर्व कष्टप्रद असूनही जातीवंत गुणवंत अरूण त्यावेळच्या नागपूर बोर्डाच्या गुणवत्ता यादीत झळकला होता. प्रचंड यशामुळे महाविद्यालय व परिसरातील आठ दहा गावात त्यांचा कौतुकांचा सत्कार सोहळा पार पडला होता. त्यावेळी डी.एड्.उमेदवाराला सहज नोकरी मिळत असे व अरूण तर गुणवत्ता यादीतील गुणवंत होता.त्यांना डी.एड्ला सहज प्रवेश मिळाला असता पण उच्च शिक्षण घेऊन प्राध्यापक होणं हे त्यांचे स्वप्न होते.शिवाय उच्च गुणांमुळे वसतिगृहात प्रवेश मिळाला होता.खाण्याचे व राहण्याचे वांदे परस्पर मिटल्यामुळे उच्च गुणवत्ता धारक अरूणने भविष्य पणाला लावत इंग्रजी विषय घेऊन सरळ बी.ए.ला प्रवेश घेतला.तीन वर्षात बी.ए.तर पूर्ण झाले. त्यानंतर चंद्रपूरातील नामांकित डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातून एम. ए. इंग्रजीचे शिक्षण पूर्ण केले.पण नोकरीच्या अनुषंगाने विचार करता एम.ए तेवढं उपयोगी पडेल,असं दृष्टीपथात नव्हतं. बी.एड्.करूनही नोकरीची शाश्वती नव्हती .मग डी.एड्. करण्याचा निर्णय घेतला. १९९७ ते ९९ या दोन वर्षात अरूण सरांनी जनता अध्यापक विद्यालय चंद्रपूर येथे डी.एड्. पूर्ण केले.या दोन वर्षात तो जननायक होता.सुरेल आवाजात त्याच्या तोंडून शुक्रतारा मंद वारा ऐकणं म्हणजे जनता अध्यापक विद्यालयसाठी सुरेल पर्वणी. हे आनंदाचे दोन वर्ष भुर्रकन निघून गेले. डी.एड. पूर्ण झाले पण त्याचवेळी शिक्षक भरतीचे प्रारूप बदलले व शिक्षण सेवक योजना आली.तीन वर्षाच्या प्रतिक्षेनंतर अरूणला जुनगाव येथे शिक्षक पदी पदस्थापना मिळाली. हा क्षण स्वर्गीय ,रम्य सुखाचा. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा प्रभाव पूर्व विदर्भात आहे.गायनाची आवड असलेला अरूण गुरूजी तुकडोजी महाराजांच्या भजनाकडे वळला.तिथूनच त्यांचा प्रवेश झाडीबोली साहित्यात झाला.झाडीबोली साहित्याच्या निमित्ताने अरूण सरांनी काव्य लेखन केले.कवितांचे खूप खूप कौतुक होऊ लागले.कौतुकामुळे उत्साह वाढला ,अरूण सरांनी अधिक जोमाने लेखन केले.त्यातूनच भूभरी या पहिल्या काव्यसंग्रहाचा जन्म झाला. निसर्ग, साहित्य व इतिहास या तीनही क्षेत्रात अरूण सरांचा मुक्त संचार आहे. घाटकुळ परिसरात नोकरीत असताना अरूण गुरूजीतील इतिहास संशोधक जागा झाला.घाटकुळ हे गाव अतिशय प्राचीन काळापासून इतिहासात उल्लेख असलेले गाव आहे.आज ते मध्यम स्वरूपाचे खेडे असले तरी एकेकाळी ते प्रांत दर्जाचे नगर होते.तिथे उत्खननात पुरातन दगड,विटा,मुर्ती सापडतात.त्यांचा अभ्यास करण्याच्या निमित्ताने अरूण सरांनी काही ऐतिहासिक संशोधनात्मक लेख लिहिले. आदिवासी क्रांतीवीर बाबुराव शेडमाके यांच्यावर अरूण गुरूजी चरित्र लेखन करत आहेत.चंद्रपूर किल्ला म्हणजे गोंड साम्राज्य.गडचिरोली भागात आदिवासी समाज त्याकाळी जमीनदार होता. बाबुराव शेडमाके हे आदिवासी जमीनदार घराण्यातील नायक. १८५७ च्या राष्ट्रीय उठावावेळी बाबुराव तेवीस चोवीसीतील तरूण होता.इंग्रज सरकारला त्यांनी सळो की पळो करून सोडले होते. शेवटी १८५८ साली इंग्रज सरकारने या महान क्रांतीकारक नायकास वयाच्या अवघ्या पंचवीसाव्या वर्षी फाशी दिली. बाबुराव नायकाचा रणसंग्राम अरूणजींच्या लेखनीतून लवकरच येईल. ज्या रिठ गावात विद्युत रोषणाई येण्यास २००५ साल उजाडले,त्या गावात अरूणने चिमणी ,कंदिलाच्या उजेडात पहिली ते बारावी अभ्यास केला व खडतर परिश्रम करून यश मिळविले.हे यश मनस्वी कौतुकास्पद आहे. जिया व टिया या कलावंत,गुणवंत दोन मुली व पत्नी यांच्यासमवेत गोंडपिंपरी येथे स्थायिक होत अरूण गुरूजींनी संसाराला सुरेख आकार दिला आहे.लोकसंग्रह व संघटन खूप छान आहे.शिक्षणाच्या माध्यमातून परिवर्तन करणारा झगडकर कुटुंबियांचा अरूण हा खरा अरूणोदय आहे.

**.कचरू चांभारे बीड 9421384434**

# रोजाचा स्थायीभाव - संयम (सब्र)

रमजान महिन्याचा दुसरा अशरा (दहा दिवसांचा कालखंड अशरा म्हणून ओळखला जातो.) आता सुरु झाला आहे.दैनंदिन दिनक्रम आता स्थिर झाला आहे. उन्हाळ्याचा त्रास ही काही अंशी अंगवळणी पडला आहे.पूर्वी मंदिरे, मशिदी या कच्च्या होत्या मात्र भक्ति करणारे भक्त पक्के होते.आता खूप बदल झालाय.रात्रीच्या नमाज मध्ये स्लबमध्ये होणाऱ्या उकाडयाची तीव्रता कमी करण्यासाठी मशिदींमधून कुलरची व्यवस्था तातडीने करण्यात येत आहे. प्रार्थना करतांनाही आरामात विना त्रास करण्याची प्रवृती वाढत आहे.आपण उन्हाळ्याची थोडीशी तीव्रता सहन करु शकत नाही,मग जे रात्रंदिवस भट्टी समोर उभे राहून कार्य करतात ते कसे सहन करीत असतील त्यांची जाणिव यानिमित्ताने सर्वांना होत असेल. रमजान महिन्यातील रोजे म्हणजे केवळ उपाशी राहणे नव्हे. संयम (सब्र)निर्मिती हा देखील रोजाचा स्थायीभाव आहे. म्हणूनच रमजानला सब्र का महिना असे ही म्हटले जाते.रमजान मध्ये उपवास सुरू केल्यानंतर आपण स्वतःच काही बंधने लादून घेत असतो. एकदा पहाटे सहेरी खाण्याची वेळ संपल्यानंतर सूर्यास्ता पर्यंत काही ही न खाण्याचा निश्चय स्वतःच करीत असतो. हीच स्वयंशिस्त आपल्यामध्ये संयम निर्माण करते. उपवास केल्याने भुकेल्याची अवस्था,




तहानलेल्यांची व्याकुळता याची जाण आपल्यात निर्माण होते. ज्यांना वेळेवर खायला अन्न मिळत नाही त्यांची काय अवस्था होत असेल याची जाणिव निर्माण होते.जे तहानलेले असतात त्यांच्या प्रती सहानुभूतीची भावना निर्माण होते. आपल्याला सर्व सुखे प्राप्त आहेत.परंतु या जगात जे दीन आहेत, गरीब,अनाथ आहेत ते आपले जीवन कसे जगत असतील याची जाणिव रोजामुळे निर्माण होते.एकदा रोजा धरल्यानंतर सायंकाळपर्यंत आता काही ही सेवन करायचे नाही अन्यथा ईश्वर नाराज होईल ही भिती मनात बाळगून आपण मगरीबची वेळ होण्याची आतुरतेने वाट पाहत असतो.अकरा महिने मगरीब आपली वाट पाहते.पण या महिनाभर आपण मगरीबची प्रतिक्षा करीत असतो. एक मिनीट जरी इफ्तारला वेळ असेल व आपल्याला कितीही तहान लागलेली असली तरी आपण समोरच्या पाण्याच्या ग्लासला हात लावीत नाही, स्वयंशिस्तीचे यापेक्षा दुसरे उदाहरण शोधूनही सापडणार नाही.
समाजातील जे गरजू घटक आहेत त्यांच्या गरजांची जाणिव व्हावी व या गरजा पूर्ण करण्याची भावना आपल्यात निर्माण व्हावी हा रोजाचा मूळ उद्देश आहे . रोजाच्या माध्यमातून ईश्वरी आदेशांचे पालन करुन आपले वर्तन सदाचारी करण्याबरोबरच आपल्या स्वच्छंदी आचरणाला लगाम घालून स्वतःचं स्वतःवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न रोजेदार हा करीत असतो.(क्रमशः)

**सलीमखान पठाण**
**9226408082.**

# भिसे खिंडीत बंद पडलेल्या अवजड वाहनांमुळे अपघाताची शक्यता

## संबंधित खात्याने कारवाई करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे-वार्ताहर**

रोहा शहरांना जोडणारा भिसे खिंडीतील रस्त्यावरुन क्षमते पेक्षा जास्त माल भरून अवजड वाहने अहोरात्र वाहतूक करीत असून अवघड चढ व वळणावर ती बंद पडण्याची संख्या वाढत असून त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. रस्त्याच्या मध्येच वाहन बंद पडल्यामुळे तसेच एका बाजूला अत्यंत खोल दरी असल्याने तेथून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसह वाहन चालक जीव मुठीत घेवून प्रवास करावा लागत असून वारंवार बंद पडणाऱ्या व क्षमतेपेक्षा जास्त माल वाहतूक वाहनांवर संबंधित खात्याने कारवाई करण्याची मागणी प्रवाशी वर्गासह वाहन चालक करीत आहेत. रोहा हे तालुक्याचे



महत्वाचे ठिकाण असल्याने शासकीय कामे तसेच उद्योग-धंदयासाठी या भिसे खिंडीतून नागोठणेकडे रोज हजारो प्रवाशी व विद्यार्थी एस.टी.,रिक्षा,मिनी डोव्हर,जीप,मोटार सायकल अशा प्रकारच्या वेगवेगळ्या वाहनांनी रात्री-अपरात्री प्रवास करीत असतात. त्यामुळे या मार्गावर सतत वाहनांची वर्दळ असते. नागोठणे-रोहा या शहरांना जोडणारा व नेहमीच रहदारीचा असलेला हा रस्ता भिसे खिंडीतील डोंगरातून जात आहे. या रस्त्यालगतच एका बाजूला अत्यंत खोल दरी तसेच दुसऱ्या बाजूला मोठा डोंगर असून अनेक ठिकाणी नागमोडी व धोकादायक वळणेही आहेत. सहसा चालकाला या वळणांचा अंदाज येत नाही. त्यातच क्षमते पेक्षा जास्त माल भरून अवजड वाहने अहोरात्र वाहतूक करीत असतात. त्यातील काही वाहने जास्त माल असल्याने तसेच इतर कारणाने चढावावर बंद पडतात. बंद वाहने ही रस्त्याच्या मध्येच असल्याने वळणावर मागून व समोरून येणाऱ्या वाहन चालकास दिसत नसून रात्री बंद पाडलेल्या वाहनांची कोणत्याही प्रकारची काळजी न घेतल्याने अपघात होण्याची भिती निर्माण होत असून तेथून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसह वाहन चालक जीव मुठीत घेवून प्रवास करीत आहेत. तरी असा वारंवार बंद पडणाऱ्या व क्षमतेपेक्षा जास्त माल वाहतूक करणाऱ्या वाहनांवर संबंधित खात्याने कारवाई करण्याची मागणी नागोठणे-रोहा येथून जाणारा-येणारा प्रवाशीवर्ग व वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.